# BK BIRLA CENTRE FOR EDUCATION

**SARALA BIRLA GROUP OF SCHOOLS**
**SENIOR SECONDARY CO-ED DAY CUM BOYS' RESIDENTIAL SCHOOL**
**PRE MID TERM EXAM ( 2024-25)**
**MARATHI**

Class : IX
Date :02 .08.2024

Duration : **1 Hrs**
Max. Marks : **25**

Admission No.:

Roll No.:

******************************************************************************

## खंड (क) वाचन कौशल्य

**प्र 1 खालील अपठित उतारा वाचून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहाः–** **5X1=5**

आपले व निसर्गाचे अगदी जीवाभावाचे नाते आहे. इथली सजीवसृष्टी निसर्गावरच अवलंबून असते. निसर्गातून आपलयाला ब–याच गोष्टीं मिळतात. अन्न,वस्त्र,निवारा या आपल्या मूलभूत गरजा निसर्गामुळे पूर्ण होतात. मानवाने आज जी काही प्रगती केली आहे ती निसर्गाच्याच मदतीने केली आहे. इथली झाडे,नदया कसलीही अपेक्षा न ठेवता दुस–याला सतत देत राहण्याची शिकवण आपल्याला देतात. निःस्वार्थी वृत्तीने आपण इतरांना मदत करावी,हे ज्ञान आपल्याला निसर्गातून मिळते. निसर्गाच्या सानिध्यात असताना आपल्याला प्रसन्न वाटते. आपल्यातील कलागुणांना वाव मिळतो. तसेच, आपल्यातील सुप्तगुणांचा विकास होतो. इथले पर्वत,डोंगर आपल्याला कठीण परिस्थितीतही खचून न जाता धैर्याने उभे राहण्याची शिकवण देतात. आकाशातील सूर्य,चंद्र,तारे हे आपल्याला अविरतपणे कार्य करण्याची शिकवण देतात. समुद्राकडून अथांगता आपल्याला शिकायला मिळते. निसर्गातील प्रत्येक गोष्ट आपल्याला शिकवायचा पुर्ण प्रयत्न करीत असते. निसर्ग बोलुन दाखवत नसला तरी आपल्या रोजच्या कृतीतून तो सारे काही आपल्याला शिकवत असतो. उत्क्रांतीच्या प्रत्येक टप्पावर निसर्गाने मानवाला मदत केली आहे.

1 जीवनसृष्टी कोणावर अवलंबून असते ?
अ मानवावर ब पैशावर क निसर्गावर ड प्रेमावर

2 मानवाच्या मुलभूत गरजा कोणत्या आहेत ?
अ कपडे ब अन्न,पाणी क अनुभव ड अन्न,वस्त्र,निवारा

3 निसर्गाच्या सानिध्यात आपल्याला कसे वाटते ?
अ प्रसन्न ब वाईट क दुःखी ड चांगले

4 आपल्याला समुद्राकडून काय शिकायला हवे ?
अ मोठेपणा ब अथांगता क विशालता ड विस्तारितता

5 कोणत्या टप्पावर निसर्गाने माणसाची मदत केली ?
अ बालपणाच्या ब तरूणपणाच्या क उत्क्रांतीच्या ड कामाच्या

## खंड (ख) व्याकरण

**प्र 2 :– पुढील वाक्यातील काळ ओळखाः–** **3X1=3**

1 हे टपोरे दवाचे थेंब खूप सुंदर आहेत .
2 मी उदया नवीन वस्त्र धारण करणार.
3 झाडावर रोज पक्षी येतात. ( भूतकाळ करा )

**प्र 3 पुढील शब्दांचे वचन बदला –** **2X1=2**

1 कैरी 2 संस्था

**प्र 4 समानार्थी शब्द लिहा :–** **2X1=2**

1 श्रीफळ 2 नदी

**प्र 5 विरूध्दार्थी शब्द लिहा :–** **2X1=2**

1 खरेदी 2 अशक्त

## खंड (ग) साहित्य

**प्र 6 स्वगत :– ( कोणतेही दोन )** **2X3=6**

1 व्यायामाचे महत्त्व तुमच्या शब्दात लिहा.

2 वाफेवर पहिली गाडी चालताना पाहून बघ्यांची मनोवस्था काय झाली असावी, अशी कल्पना करून तुमच्या शब्दांत लिहा .

## खंड (घ) लेखन

**प्र 7 पत्र लिहाः–** **1X5=5**

शाळेच्या ग्रंथालयासाठी नवीन पुस्तके मागवण्यासाठी नवनीत पुस्तक भंडारास पत्र लिहा :–

—————————————— समाप्त ——————————————